नगरसचिव कार्यालय

3

# पुणे महानगरपालिका

## स्थायी समितीचा ठराव

सभा क्रमांक :- ७६ | दिनांक - १६/३/२०२१

विषय क्रमांक :- १४२७ | ठराव क्रमांक :- १४५० | खाते :- मा.मुख्य लेखापरिक्षक

---

संदर्भ:- मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/२३०३ दि.५/३/२०२१ ने पाठविलेला

सन २०१८-२०१९ चा वार्षिक वृत्तांत

---

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाचा कारभारविषयक आणि हिशोब तपासणीबाबतचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी पाठविलेला सन २०१८-२०१९ चा वार्षिक वृत्तांत अवलोकन केला.

सदर वार्षिक वृत्तांताच्या प्रती मा.महा.आयुक्त यांनी छापून सर्व मा.सभासदांना पाठवाव्यात.

मा. नगर सचिव
मा. मुख्य लेखा व वित्त अधि.
मा. व्यवस्थापक मुद्रणालय

यांजकडेस पुढील तजविजीसाठी
सविनय सादर...

(सही) २०/१०/२१
अधिक्षक
महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका

→ मा. सह. महा. आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक)

(सही)
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

O-No. 11818

01 NOV 2021

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र : २६५५
दिनांक ३/११/२१

श्रीमती राव

(सही)
मुलेप

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
जावक क्रमांक : मुलेप/ 2303
दिनांक : 04/03/२०१९

मा.नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस...

**<u>विषय</u>** :- सन २०१८-२०१९ चा मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाचा कारभारविषयक आणि हिशेब तपासणीचा अहवाल.

महोदय,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाचा कारभारविषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २०१८-२०१९ च्या वार्षिक वृत्तांताच्या दोन प्रती आम्ही सादर करीत आहोत. तो मा.स्थायी समितीपुढे ठेवावा अशी विनंती आहे.

मा. स कळावे,

आपला विश्वासू,
सही/-
सह महापालिका आयुक्त
(मुख्य लेखापरीक्षक),
पुणे महानगरपालिका.

प्रत :- मा.महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका. यांजकडेस...

माहितीसाठी व जरूर त्या पूर्ततेसाठी विषयांकित वृत्तांताची एक प्रत पाठवित आहोत.

मा.स.कळावे.

सही/-
सह महापालिका आयुक्त
(मुख्य लेखापरीक्षक),
पुणे महानगरपालिका.

प्रत :- मा.मुख्य लेखापाल,
पुणे महानगरपालिका. यांजकडेस...

माहितीसाठी व जरूर त्या पूर्ततेसाठी विषयांकित वृत्तांताची एक प्रत पाठवित आहोत.

मा.स.कळावे.

सह महापालिका आयुक्त
(मुख्य लेखापरीक्षक),
पुणे महानगरपालिका.

**मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय,**
पुणे महानगरपालिका.

मा.अंबरिष र.गालिंदे,
मुख्य लेखापरीक्षक,
पुणे महानगरपालिका.

यांजकडून...

मा. नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस...

**विषय :- सन २०१८-२०१९ चा मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाचा कारभारविषयक आणि हिशेबतपासणीचा अहवाल.**

महाशय,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये मुख्य लेखापरीक्षक कार्यालयाचा कारभारविषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २०१८-२०१९ चा वार्षिक अहवाल आम्ही सादर करीत आहोत. तो मा.स्थायी समितीपुढे ठेवावा अशी विनंती आहे.

**१)** आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर गतवर्षाचा वृत्तांत मा.स्थायी समितीला शक्य तितक्या लवकर सादर करणे आवश्यक असते. हिशेबी वर्ष पूर्ण झाल्यानंतर मुख्य लेखापाल खात्याकडून त्या वर्षाचे हिशेब पूर्ण करुन हिशेबाचे फायनल शीट व अर्थव्यवस्थेचे तक्ते आणि तदनुषंगिक कागदपत्रे तपासणीसाठी आम्हास उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१८-२०१९ मधील वार्षिक जमाखर्चाचे एकवटपत्रक आमचे खात्याकडे आवक क्रमांक मुलेप/६८७६ दि. ५.३.२०२० ने प्राप्त झाले. तथापि खात्याकडून हिशेब पूर्ण करणेचे काम चालू असतानाच हिशेब तपासणी अहवालास उशीर होऊ नये म्हणून कागदपत्र उपलब्धतेनुसार तपासणी सुरू केली. हिशेबाची व कागदपत्रांची छाननी करणेस आमचे खात्यास काही कालावधी लागतो. वार्षिक अहवालातील अर्थव्यवस्थेचे तक्ते व इतर माहिती बिनचूक व वस्तुस्थिती निदर्शक असणे आवश्यक आहे.